जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/ ०७ /२०२०

दिनांक - ०७ /०१/२०२०

**प्रेसनोट**

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयात दिनांक ०७/०१/२०२० ते दिनांक २१/०१/२०२० पर्यंत लेखी स्वरुपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**तळवडे वाहतुक विभाग अंतर्गत**

**वरील प्रमाणे तळवडे वाहतुक विभाग अंतर्गत** २ टनापेक्षा जास्त मालवाहतुक करणा-या अवजड वाहनांना आयटी पार्क चौक, तळवडे गावठाण चौक, त्रिवेणीनगर चौक या रस्त्यांवर सकाळी ०८.०० ते ११.०० वाजे पर्यंत व सायंकाळी १६.०० ते २१.०० वाजेच्या **पर्यंत प्रवेश बंदी आदेश (नोटीफिकेशन )करण्यात येत आहे.**

**(सुधीर हिरेमठ)भा.पो.से.**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

३) सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) प्रभारी अधिकारी तळवडे वाहतुक विभाग

५) कार्याकारी अभियंता एम आय डी सी

२/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned by CamScanner

## प्रेस नोट

**जा.क्र.पोउआ/वाहतुक/ ८७ /२०२० पिंपरी चिंचवड शहर दिनांक- ८/०१/२०२०**

पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी वाहतुक विभागाचे हद्दीतील भक्ती शक्ती चौक, येथील ग्रेड सेपरेटर व उड्डाणपुलांचे काम करण्याचे नियोजित केले आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम. व्ही.ए. ०१९६/८७१/सी आर-३७/टीआरए-२,दिनांक २७/०९/१९९६चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पिंपरी चिंचवड शहर भक्ती शक्ती चौक कडुन मुंबई-पुणे व पुणे-मुंबई जाणा-या रोडवर खालील प्रमाणे तात्पुरते बदल करण्यात येत आहेत.

१) **पुणेकडून मुंबईकडे जाणारी वाहतुक** - भक्ती शक्ती चौकातून डावे बाजुला वळवून अप्पुघरमार्गे ट्रान्सपोर्ट नगर मधुन वाहतुक पुणे मुंबई रस्त्यावर वळवतील.

२) **पुणेकडुन त्रिवेणीनगरकडे जाणारी वाहतुक** - भक्ती शक्ती चौकातून डावे बाजुला वळवून अप्पुघरमार्गे ट्रान्सपोर्ट नगर मधुन निगडी नाका येथुन यु टर्न करुन पी एम पी एम एल बस डेपोमधून डावीकडे वळून त्रिवेणीनगरकडे वाहने जातील.

३) **मुंबईकडून पुणेकडे जाणारी वाहतुक** - मुंबईकडुन येणारी वाहने पी एम पी एम एल बस डेपोमधून डावीकडे वळून चिकन चौकातून उजवीकडे वळवून दुर्गा चौकाकडे वाहतुक वळवतील दुर्गा चौकातून उजवीकडे टिळक चौकाकडे अथवा दुर्गा चौकातून सरळ टेल्को रोडने थरमॅक्स चौकातून खंडोबामाळ कडे वाहतुक वळवतील.

४) **मुंबईकडुन भेळ चौक,चिंचवडकडे जाणारी वाहने** - मुंबईकडुन येणारी वाहने पी एम पी एम एल बस डेपोमधून डावीकडे वळून चिकन चौक ,दुर्गाचौक, टिळक चौक मार्गे भेळ चौक, चिंचवडकडे जातील.

५) **संभाजी चौकाकडून मुंबईकडे जाणारी वाहतुक** - संभाजी चौकाकडून येणारी वाहने अप्पुघरमार्गे ट्रान्सपोर्ट नगर मधुन मुंबई पुणे रस्त्यावर वाहतुक वळवतील.

६)संभाजी चौकाकडून त्रिवेणीनगरकडे जाणारी वाहतुक - संभाजी चौकाकडून येणारी वाहने अप्पुघरमार्गे ट्रान्सपोर्ट नगर मधुन निगडी नाका येथुन यु टर्न करुन पी एम पी एम एल बस डेपोमधून डावीकडे वळून त्रिवेणीनगरकडे वाहने जातील.अथवा भेळ चौक,टिळक चौक मार्गे त्रिवेणीनगरकडे जातील.

७) **त्रिवेणीनगरकडून पुणेकडे जाणारी वाहतुक** - त्रिवेणीनगरकडून पुणेकडे जाणारी वाहने टिळक चौकमार्गे अथवा थरमॅक्स चौक,खंडोबामाळ चौक मार्गे पुणेकडे जातील.

८)**त्रिवेणीनगरकडून संभाजी चौक बिजलीनगरकडे जाणारी वाहतुक** – त्रिवेणीनगर चौकातून बिजलीनगरकडे जाणारी वाहतुक दुर्गाचौक,टिळक चौक मार्गे भेळ चौकातून बिजलीनगरकडे जातील.

९) **त्रिवेणीनगरकडून मुंबईकडे जाणारी वाहतुक** - त्रिवेणीनगरकडून मुंबईकडे जाणारी वाहतुक टिळक चौक, भक्तीशक्ती चौकातून डावीकडे वळुन अप्पुघरमार्गे ट्रान्सपोर्ट नगर मधुन मुख्य रस्त्यावरुन मुंबईकडे जातील. अथवा टिळक चौकातून भेळ चौक मार्गे,रावेत मार्गे मुंबईकडे जातील.

**१०) सदरचे पुलाचे कामाकरीता ते टप्याटप्याने डायव्हर्शन करणार आहेत. प्रथम भक्तीशक्ती चौकातून डावीकडे वळवून ट्रान्सपोर्टनगरमार्गे मुंबईकडे वाहतुक वळविणार आहेत. तसेच काही कालावधीनंतर मुंबईकडून पुणेकडे जाणाऱ्या वाहतुकीचे डायव्हर्शन भक्ती शक्ती पी एम पी एल बस डेपोमधून डावीकडे वळवून चिकन चौकातुन उजवीकडे दुर्गा चौकाकडे वाहतुक वळविणार आहेत.**

Scanned by CamScanner

• तरी वरील वाहतुक बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर ,वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

(सुधीर हिरेमठ)भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रतः-
१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानापत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.
२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.
३) पोलीस निरीक्षक निगडी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार/ प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करुन त्यांची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टसह दोन दिवसात सादर करावी.

४) मे. बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि.पुणे
२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned by CamScanner